* बातमी - पान न.

सोमवार १६/९/२०१९ अंक २३६ ३ ₹ पाने १०

# ऐक्य

भाद्रपद कृ. २ शके १९४१ नक्षत्र रेवती

सूर्योदय - ०६:२३:०८ सूर्यास्त - ०६:३४:४१ | उद्या अग्निहोत्र वेळ सातारा | सूर्योदय-०६:२३:१७ सूर्यास्त-०६:३३:५० | चंद्रोदय - ०८:१०:२६ चंद्रास्त - ०७:५५:०० | दिवसाचे तास - रात्रीचे तास -



शिवकृपा पतपेढीच्या सातारा शाखेचे उदघाटन करताना अविनाश फडतरे, शेजारी कृष्णा शेलार, वसंतराव चव्हाण, प्रीती काळे व संचालक.

## शिवकृपा पतपेढीने राज्यातील सहकार क्षेत्राला दिशा दिली : अविनाश फडतरे

▲ **कोरेगाव**, दि. १५ : संपूर्ण देशात सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या शिवकृपा सहकारी पतपेढीने महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राला दिशा दिली आहे. प्रशिक्षित कर्मचारी-अधिकारी व उच्च तंत्रज्ञान यामुळे पतपेढीने सभासद-ग्राहकांचा विश्वास जिंकला आहे, असे गौरवोदगार सातारा जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी काढले.

पतपेढीच्या सातारा शाखेच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन फडतरे यांच्या हस्ते व सहाय्यक निबंधक प्रीती काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पतपेढीचे अध्यक्ष कृष्णा शेलार, उपाध्यक्ष वसंतराव चव्हाण, संचालक उपस्थित होते.

फडतरे म्हणाले, पतपेढीने नेहमीच पारदर्शक कारभार केला आहे. ग्राहकांची मने जिंकली आहेत. आधुनिक बँकिंग प्रणालीचे कामकाज आहे. सामान्यातील सामान्य माणसाला पत मिळवून देण्याचे काम केले आहे.

कृष्णा शेलार म्हणाले; पतपेढीने अर्थकारणाबरोबरच समाजकारणाकडे लक्ष दिले आहे. सभासद, ठेवीदार व हितचिंतकांच्या दृढविश्वासामुळे पतपेढीने २ हजार कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. सातारा शहर व परिसरातील विकासामध्ये पतपेढीचे निश्चितपणे योगदान राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रीती काळे, जिल्हा परिषद सदस्या अर्चना देशमुख, प्रदीप कांबळे, ह.भ.प. सापते महाराज यांनी मनोगत व्यक्त केले. विभागीय अधिकारी ज्ञानेश्वर बांदल यांनी स्वागत व सूत्रसंचालन केले. कर्ज वितरण अधिकारी हणमंत अनभुले यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सोलापूर विभागीय अधिकारी संतोष देशमुख, दुर्योधन माने, राजेंद्र साळुंखे, शंकर शिंदे, नीलेश देशमुख, शाखाधिकारी अवधूत फडणीस, पर्यवेक्षक वैभव कदम यांनी परिश्रम घेतले.

यावेळी संचालक अविनाश भोसले, जयवंत खामकर, अशोक तुपे, बबन काटे, ॲड. अशोक शिंदे, दीपक संकपाळ, महेश देशमुख, वर्षा कळबे, तज्ञ संचालक पांडुरंग घाडगे, अशोक शिंदे, कर्मचारी प्रतिनिधी दीपक येवले, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत शेळके, सयाजी चव्हाण, सुधीर घार्गे, डॉ. सत्यजित पाटणे, प्रभाकर शिंदे, दशरथ सगरे, ॲड. शिवाजीराव मर्ढेकर, ॲड. रफिक शेख, ठेवीदार व ग्राहक उपस्थित होते.

## पाटण तालुक्यात मतदान यंत्र प्रात्यक्षिक मोहिमेस प्रारंभ

▲ **पाटण**, दि. १५ : पुढील महिन्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत नागरिकांना मतदान करताना सुलभता यावी यासाठी गावा-गावात मतदान यंत्रे पाठवून मतदारांना समजेल असे त्याचे दि. १३ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर÷दरम्यान मतदान यंत्र प्रात्यक्षिक दाखवण्यात येत आहे. मतदारांनीही याची माहिती करून घ्यावी, असे आवाहन पाटण उपविभागीय अधिकारी श्रीरंग तांबे यांनी केले आहे.

पाटण विधानसभा मतदारसंघात आगामी काळात विधानसभा निवडणूक होत असून नवीन मतदारांसह जुन्या मतदारांना मतदान मशिनवर मतदान कसे करावे याचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी दोन पथके नेमली आहेत. ही पथके गावोगावी जावून मतदारांना प्रात्यक्षिक दाखवणार आहेत. १३ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर या संपूर्ण महिन्यात विविध तारखेला मतदान मशिन येणार असून यावेळी प्रशिक्षित कर्मचारी मतदारांना माहिती देणार आहेत. प्रत्येक गावात प्रात्यक्षिक दाखवण्याच्या तारखा वेगवेगळ्या असून मतदारांनी याची माहिती करून घ्यावी.